MHAH250011812014

## नियमित दिवाणी दावा नं.५७६/२०१४ नि.२८ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी यांनी वादीला दाव्यात योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प भरण्याचा आदेश होण्याकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांचे अर्जातील कथन की, सदरचा दावा वादीने वाटपासाठी व इतर दादींसाठी कोर्टात दाखल केला आहे. वादीने दाव्याचा योग्य तो आकार करुन त्यावर योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प दिला नाही अशी तक्रार प्रतिवादीने त्यांच्या लेखी कैफियतीमध्ये घेतलेली आहे. दावा मिळकत १ब ही घर मिळकत असुन तिचे दुय्यम निबंधक यांचे कार्यालयातुन मुल्यांकन करुन घेवुन त्याप्रमाणे दाव्याचा आकार करुन त्यावर योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प भरणे गरजेचे आहे. तसेच प्रतिवादी नं.१ यांनी प्रतिवादी नं.२, ३ यांना दावा मिळकतीचे करुन दिलेले खरेदीखत बिन भरण्याचे, पोकळीस्त, बिन कब्जाचे असल्याबाबत वादीने दाव्यात कथन केल्याने खरेदीखताच्या रकमेनुसार दाव्याचा आकार करुन त्यावर योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प देणे गरजेचे आहे. परंतु वादीने तसा कोर्ट फी स्टॅम्प दिला नाही. वादी नं.१ ही महिला आहे. वादी नं.२ हा पुरुष आहे. कायदयाने फक्त महिलांना वैवाहीक संबंधातील वादासाठी कोर्ट फी स्टॅम्प माफ असल्याने जास्तीत जास्त वादी नं.१ ला कोर्ट फी स्टॅम्प माफ होईल. वादी नं.२ चा कोर्ट फी स्टॅम्प भरणे गरजेचे आहे. त्यामुळे वादीला दाव्याचा योग्य तो आकार करुन त्यावर योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प भरण्याचा आदेश व्हावा ही त्यांनी विनंती केली आहे.

३. वादींनी प्रस्तुतच्या अर्जाला त्यांचे लेखी म्हणणे देवुन आक्षेप घेतला आहे की, प्रतिवादी यांचा अर्ज खरा व बरोबर नाही. वादी नं.१ ही महिला असुन वादी नं.२ हा अ.पा.क आहे. शिवाय त्यास कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. तसेच वादी हे प्रतिवादी यांनी नोंदविलेल्या खरेदीखतामध्ये पार्टीज नाहीत. तसेच वादी अ.पा.क. असताना वडिलोपार्जित मिळकतीचे झालेले व्यवहार हे अ.पा.क. वर बंधनकारक नाहीत व त्या व्यवहारास कायद्याने अ.पा.क. यांना स्टॅम्प देण्याची कायद्याने गरज नाही. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी व वादी यांच्या दोन्ही विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दोन्ही विद्वान विधीज्ञांनी त्यांच्या अर्जातील व लेखी म्हणण्यातील कथनांचा पुनःउच्चार केला. दाव्याचे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. प्रतिवादींनी असा आक्षेप घेतला आहे की, वादी यांनी दाव्याचा योग्य तो आकार केला नाही. तसेच योग्य ती कोर्ट फी भरलेली नाही. प्रतिवादींच्या कथनानुसार वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ व ३ यांना करुन दिलेले खरेदीखत आव्हानीत

केले असल्यामुळे सदर खरेदीखताच्या रक्कमेवरती वादींनी कोर्ट फी स्टॅम्प भरणे अपेक्षीत आहे. याउलट वादींच्या विद्वान विधीज्ञांनी युक्तिवाद केला की, वादी हे सदर खरेदीखतास पार्टी नसल्यामुळे त्यांनी केवळ सदर खरेदीखत हे वादींच्या हिश्यावर बंधनकारक नाही अशा जाहीर ठरावाची मागणी केली आहे. त्यामुळे वादींनी सदर खरेदीखताच्या रक्कमेवर कोर्ट फी स्टॅम्प भरण्याची गरज नाही. कायदयाचे हे गृहीत तत्वे आहे की, जर वादी किंवा प्रतिवादी हे सदर दस्तास पार्टी नसतील तर ते केवळ सदर दस्त त्यांच्या वर बंधनकारक नाही असा हुकुम न्यायालयाकडून मागु शकतात. वादींनी सदर खरेदीखत रद्द करुन मागीतले असते तर प्रतिवादी म्हणतात त्याप्रमाणे वादींना सदर खरेदीखताच्या रक्कमेवरती कोर्ट फी स्टॅम्प देणे आवश्यक झाले असते. परंतु वादींनी सदर खरेदीखतातबाबत केवळ जाहीर ठरावाची मागणी केली असल्यामुळे त्यांना सदर खरेदीखताच्या रक्कमेवरती कोर्ट फी स्टॅम्प भरण्याची आवश्यकता नाही.

६. प्रतिवादींनी दुसरा आक्षेप घेतला आहे की, वादी यांनी दावा मिळकत १ब या घर मिळकतीत देखील वाटप मागितले आहे. परंतु वादींनी सदर मिळकतीचे मुल्यांकन दाखल केलेले नाही. तसेच त्या मुल्यांकन आधारे योग्य ती कोर्ट फी स्टॅम्प भरलेली नाही. प्रतिवादींनी प्रस्तुतच्या अर्जासोबत सदर मिळकतीचे शासकीय मुल्यांकन पत्रक निशाणी क्र.३२ वर दाखल केले आहे. सदर मुल्यांकन पत्राचे अवलोकन केले असता सदर मिळकतीचे एकत्रीत अंतीम मुल्य १६,६८,३१५.६/– इतके असल्याचे दिसुन येते. वादींनी सदर मिळकतीमध्ये त्यांचा १/४ हिस्सा असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे सदर संपुर्ण रक्कमेच्या १/४ रक्कमेवर वादी यांनी योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प भरला असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे प्रथमदर्शणी वादी यांनी दाव्याचा योग्य तो आकार व योग्य ती कोर्ट फी भरल्याचे दिसुन येत नाही. दावा हा वाटप व जाहीर ठरावासाठी असल्यामुळे त्यात वादी क्र.१ या महिला असल्याचा त्यांना बचाव घेता येणार नाही. त्यामुळे सदर दावा मिळकत १ब च्या संपुर्ण मुल्यांकनाच्या १/४ रक्कमेवर वादी यांनी कोर्ट फीस भरणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खाली आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) प्रतिवादी यांचा अर्ज अंशतःमंजुर करण्यात येतो.

२) वादी यांनी निशाणी क्र.३२ वर दाखल दावा मिळकत १ब च्या मुल्यांकन पत्रातील मुल्यांकनानुसार त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हिश्यास येणा–या १/४ हिश्याचा योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प पुढील तारखेपर्यंत न्यायालयात भरावा.

३) अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट.

KANAKDANDE SHRIHARI
Digitally signed by KANAKDANDE SHRIHARI
Date: 2026.04.21 17:40:57 +0530

(एस.आर.कनकदंडे)

**दिनांकः२१/०४/२०२६.** **२ रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**
**पारनेर, जि.अहमदनगर.**